Open Access
उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका
(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 185 – 188
DOI: 10.5281/zenodo.10115349

Original Research Article

# भारतीय (गांधीयुग) स्वातंत्र्य चळवळीत स्त्रियांचा सहभाग

प्रा. डॉ. शारदा गोविंदराव बंडे

विभाग प्रमुख, इतिहास विभाग, स्वा. सै. सुर्यभानजी पवार महाविद्यालय, पूर्णा (जं.) जि. परभणी ४३१५११ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: dr.sharadabande17400@gmail.com

Received: 14 October, 2023 | Accepted: 25 October, 2023 | Published: 27 October, 2023

## प्रस्तावना

भारतीय स्वातंत्र्य चळवळीत म.गांधीचे स्थान अत्यंत महत्वाचे आहे. टिळकांच्या मृत्यूनंतर 1920 पासून भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व गांधीजीकडे आले. भारतीय स्वातंत्र्य लढा हा त्यांच्या व्यक्तीमत्व व कार्याभोवती केंद्रीत झाला. 1920-1947 हा कालखंड गांधीयुग म्हणून ओळखला जातो. गांधीजींच्या व्यक्तीमत्वामुळे भारतातील व विदेशातील अनेक स्त्रिया त्यांच्याकडे आकर्षित झाल्या होत्या. गांधीजींनी विविध कार्यक्रमात सहकारी म्हणून स्त्रियांना सामील करून घेतले. गांधीजींच्या प्रेरणेमुळे शेकडो स्त्रिया घराबाहेर पडल्या व समाजसेवा करू लागल्या. स्वातंत्र्य चळवळीतही योगदान देऊ लागल्या. सामान्य स्त्रियांमध्ये काम करण्यास त्यांनी सुशिक्षीत स्त्रियांना आवाहन केले होते. गांधीजींनी स्त्रिया या राष्ट्राच्या नागरिक असल्यामुळे त्यांनीही पुरूषांच्या बरोबरीने स्वातंत्र्याच्या चळवळीत भाग घेतला पाहिजे अशी भूमिका मांडली होती. स्त्रियांना आपल्या लढ्यामध्ये सामील न करून घेण्याच्या आपल्या लोकांच्या वृत्तीमुळे येथील चळवळीचे अपेक्षित परिणाम दिसून येत नाहीत असे त्यांचे मत होते.

## विजयालक्ष्मी पंडित

युनोच्या पहिल्या महिला अध्यक्ष, महाराष्ट्राच्या राज्यपाल, भारताच्या राजदूत अशी विविधअंगी ओळख असलेल्या विजयालक्ष्मी पंडित या एक प्रसिद्ध महिला होत्या. विवाहापूर्वीच विजयालक्ष्मीचा गांधीजीशी संपर्क आला होता. इ.स. 1930-31 च्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीत त्यांनी भाग घेतला होता. 1932 मध्ये त्यांना तुरुंगावासाची शिक्षा झाली होती. इ.स.1934 मध्ये अलाहाबाद नगरपालिकेच्या सदस्या म्हणून त्या निवडल्या गेल्या. नगरपालिकेचे शिक्षण

सभापती पदही त्यांच्याकडेच होते. इ.स.1397 मध्ये ज्या प्रांतीय निवडणुका झाल्या त्यात उत्तर प्रदेशातून निवडून आल्या व प्रांतात त्यांना मंत्रीपद मिळाले. भारतात प्रांतात मंत्रीपद भूषविणाऱ्या त्या पहिल्याच महिला होत. इ.स.1940-42 मध्ये त्यांना ब्रिटिशांनी तुरुंगात टाकले होते. 9 महिने त्या तुरुंगात होत्या. 1940-42 च्या काळात अखिल भारतीय महिला संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले होते. भारत सरकारचा 'पद्मविभूषण' हा पुरस्कार त्यांना मिळाला होता.

**सुचेता कृपलानी**

25 जून 1908 रोजी कृपलानीचा जन्म अंबाला येथे झाला. बनारस हंदू विश्वविद्यालयात त्या प्राध्यापिका होत्या. गांधीजींच्या आवाहनास प्रतिसाद देवून प्राध्यापिकेची नोकरी सोडून 1940 मध्ये गांधीजींच्या व्यक्तीगत सत्याग्रहात त्यांनी भाग घेतला. असफ अलीबरोबर भूमिगत राहून त्यांनी कार्य केले. 1946 मध्ये बंगालमध्ये जातीय संघर्ष निर्माण झाला तेव्हा गांधीजीबरोबर त्या तेथे गेल्या होत्या. तो हिंदू-मुस्लिम तणाव शांत करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. 1946 मध्ये संविधान सभेच्या सदस्य म्हणून निवडल्या गेल्या. सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रात स्त्रियांना संधी मिळावी म्हणून त्यांनी खूप प्रयत्न केले. त्या एक उत्तम संसदपटू होत्या. संसदेच्या सदस्य असताना त्यांची भाषणे संसद सदस्य गांभीर्याने ऐकत. उत्तरप्रदेशच्या मुख्यमंत्री असताना अनेक कठिण प्रश्न त्यांनी सोडविले.

**कमलादेवी चटोपाध्याय**

मंगलोर येथे ब्राम्हण कुटुंबात जन्म. मुळात बालविधवा होत्या. गांधीजींचा 'हिंद स्वराज्य' हा ग्रंथबंदी असतानाही विकला गेला होता. या परिषदेत भाषण करताना ब्रिटिश साम्राज्याने भारतात केलेली लूट व ब्रिटिश सरकारने भारतीय जनतेवर चालविलेले जुलूम याचे अनेक भेदक वर्णन केले होते. मिठाच्या सत्याग्रहात पुरूषाप्रमाणे स्त्रियांना सहभाग करून घ्यावे अशी आग्रहाची विनंती कमलादेवींनी गांधीजींना केली होती. मिठाच्या सत्याग्रहात त्यांचा सहभाग होता. त्यासाठी त्यांना 6 वर्ष तुरुंगवास झाला होता. इ.स.1929 मध्ये ऑगस्टमध्ये युरोपात प्राग येथे आंतरराष्ट्रीय महिला परिषदेला त्या हजर राहिल्या. सायमन कमिशनवर बहिष्कार टाकण्याच्या कामात त्या सहभागी झाल्या होत्या. 1942 च्या लढ्यात त्यांना अटक झाली. एक वर्ष त्या तुरुंगात होत्या. इ.स.1965 मध्ये मॅगसेस पुरस्कार मिळाला होता.

**अरूणा असफअली**

एका रूढीवादी बंगाली कुटुंबात अरूणा गांगुलीचा (असफअली हे पतीचे नाव) जन्म झाला. अलाहाबाद येथे काँग्रेस नेते असफ अली यांच्याशी त्यांची ओळख झाली. आई वडिल व परिवाराचा विरोध असतानाही अरूणा गांगुलीने असफ अलीशी आंतरधर्मीय विवाह केला. 1930 च्या मिठाच्या सत्याग्रहाच्या वेळी अरूणा असफअलींनी जनसभापुढे व्याख्याने दिली. एवढेच नव्हे तर निदर्शनाचे नेतृत्वही केले. तेव्हा एक वर्ष कारावासाची शिक्षा त्यांना झाली. गांधीजींनी हस्तक्षेप केल्यानंतर त्यांची सुटका झाली.

**सरोजिनी नायडू**

स्वातंत्र्ययोद्ध्या, कवयित्री, स्वतंत्र भारतातील उत्तर प्रदेशाच्या पहिल्या महिला राज्यपाल, उच्चशिक्षित व बहुभाषिक ज्ञान असलेली महिला अशी सरोजिनी नायडू यांची अष्टपैलू ओळख आहे. 13 फेब्रुवारी 1879 रोजी हैद्राबादेत जन्म झाला. मद्रास प्रांतातून त्या सर्वाधिक गुण घेवून मॅट्रीक परीक्षा पास झाल्या होत्या. 'सीलकन्या' ही 1300 ओळीची कविता त्यांनी लिहिली होती. प्रसिद्ध क्रिकेट खेळाडू सी.के.नायडू बरोबर त्यांचा विवाह झाला होता. इ.स.1919 पासूनच त्या स्वातंत्र्य आंदोलनात उतरल्या होत्या. जालीयनवाला बाग हत्याकांडाचा निषेध म्हणून त्यांनी सुवर्णपदकासह 'कैसर-ए-हिंद' ही पदवी परत केली. इ.स.1925 च्या कानपूर येथील राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनाच्या त्या अध्यक्ष होत्या. दांडी यात्रेत सहभागी होणारी ही पहिलीच महिला होती.

**राजकुमारी कौर**

पंजाबमधील कपूरथला संस्थानचे राजा हरनामसिंग यांच्या पोटी 1889 मध्ये जन्म झाला. उच्च शिक्षण इंग्लंडमध्ये झाले. खेळात अधिक रस होता. 1930 च्या कायदेभंग चळवळीत त्या सहभागी झाल्या होत्या. 15 वर्ष गांधीजींच्या सचिव होत्या. इ.स.1931 मध्ये अखिल भारतीय महिला परिषदेचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले होते. 1942 च्या भारत छोडे चळवळीतही त्या सहभागी होत्या. 1952 च्या केंद्रात पं.नेहरूचे पहिले मंत्रीमंडळ होते. त्यात त्या आरोग्यमंत्री होत्या. 1954 मध्ये त्यांचा मृत्यू झाला.

**प्रेमा कंटक**

इ.स.1930-32 च्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीत त्यांचा सहभाग होता. 1939 मध्ये प्रेमा कंटक यांनी गांधीजींच्या वासनेवर नियंत्रण मिळविण्यासाठी केलेल्या झगड्याविषयीचा पत्रव्यवहार त्यांच्या संमतीनेच प्रसिद्ध केला तेव्हा गांधीवर जास्त टिका झाली. 'सत्याग्रही महाराष्ट्र' या ग्रंथाच्या त्या लेखिका आहेत. गांधीवादी म्हणून त्या ओळखल्या जात.

**कस्तुरबा गांधी**

गांधीजीपेक्षा वयाने 6 महिन्यांनी मोठ्या. 13 व्या वर्षी विवाह. गांधीजींच्या बहिष्कार मोहमेत त्या सहभागी झाल्या. इ.स.1930 मध्ये कस्तुरबाच्या नेतृत्वाखाली ठाण्याजवळ कळवा येथे सत्याग्रहात सामील झाल्या. अनेकदा तुरूंगवास, गोलमेज परिषदेला त्या गांधीजी सोबत गेल्या होत्या. 1942 च्या लढ्यात सहभागी होत्या. 1944 मध्ये पुण्यात आगाखान पॅलेसमध्ये त्यांचे निधन झाले.

**मृदुलाबेन साराभाई**

गुजरातमध्ये एका धनाढ्य कुटुंबात जन्म झाला. वडील अंबालाल साराभाई धनवान गिरणीमालक होते. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ख्याती मिळविलेली व्यक्ती त्यांच्या घरी येत असत. अंबालालचे घरदार हळूहळू गांधीजींच्या विचाराने

व्यापले. त्यांच्या घरातील सर्व स्त्रिया गांधीजींच्या प्रभावाखाली गेल्या. त्यांच्या निर्णयामुळे अनेक तरूण स्त्रियांना स्वातंत्र्य लढ्यात सामील होता आले. इ.स.1938 च्या हरिपुरा काँग्रेसच्या अधिवेशनात स्वयंसेवकाची प्रमुख भूमिका पार पाडली. त्या स्त्री स्वातंत्र्य व स्त्री-पुरूष समानतेच्या पुरस्कर्त्या होत्या.

अशा प्रकारे समाजात पडदा पद्धत असताना सुद्धा देश स्वातंत्र्यासाठी विविध भूमिका पार पाडणाऱ्या विविध महिला होत्या. प्रत्येक क्षेत्रात त्यांची भूमिका फार महत्त्वाची होती हे विसरता कामा नये. कारण प्रत्येक क्षेत्रात तिची मदत झाली आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची**

१. प्राचार्य डॉ.एस.एस.गाठाळ, आधुनिक भारताचा इतिहास, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, सप्टेंबर 2016.
२. संपादक श्रीराम जाधव, गांधीजी आणि सामाजिक समता, महात्मा गांधी अध्ययन केंद्र, देवगिरी, महा. औरंगबाद, 2009.
३. प्राचार्य डॉ. एस.एस. गाठाळ, भारतीय राष्ट्रीय चळवळीचा इतिहास, कैलास पब्लिकेशन्स, औरंगपूरा औरंगाबाद, सप्टेंबर 2017.
४. डॉ.अनिल कठारे, आधुनिक भारताचा इतिहास, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, जून 2015.